RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक ३९] बुधवार, मार्च ३०, २०१६/चैत्र १०, शके १९३८ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ९८**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मार्च २०१६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक. १५१६/प्र.क्र. ३१/कराधान-१.—महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२(२००५चा महा.९) च्या कलम ९च्या उप-कलम (१) द्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची ‘क’ आणि ‘ग’ मध्ये, दिनांक १ एप्रिल २०१६ पासून खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

**एक. अनुसूची क मध्ये,—**

(१) नोंद ९क च्या स्तंभ (२) मधील, “ दिनांक ३१ मार्च २०१६” या अंक व शब्दां ऐवजी “ दिनांक ३१ मार्च २०१७” हे अंक व शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(२) नोंद १२क ऐवजी, खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

| | | |
|---|---|---|
| “१२क (१) | राज्यशासन, वेळोवेळी, राजपत्रात अधिसूचीत करील अशी कॅन्सरवरील उपचाराकरिता वापरण्यात येणारी औषधे. | शून्य टक्के ; |
| (२) | ब्रेस्ट कॅन्सरच्या निदानासाठी वापरण्यात येणारी मॅमोग्राफी मशिन्स्. | |

(३) नोंद १३ नंतर, खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

| | | |
|---|---|---|
| “१३क | राज्यातील सार्वजनिक परिवहन उपक्रमांना सार्वजनिक वाहतुकीसाठी केलेली बॅटरी किंवा हायब्रीड इलेक्ट्रीक बसेसची विक्री. | शून्य टक्के ; |

(४) नोंद २७ क नंतर, खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

| | | |
|---|---|---|
| “२७ख | बांबूचे फर्निचर वगळता, बांबूपासून बनविलेली हस्तकला उत्पादने. | शून्य टक्के ; |

(५) नोंद ५१ च्या स्तंभ (२) मध्ये,–

(क) उप-नोंद (सात) मध्ये "टॉवेल" या शब्दाऐवजी "केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम, १९८५ (१९८६ चा ५) च्या शीर्ष बाब क्र. ६३०४ ९२ ६० खाली समाविष्ट असलेले टॉवेल" हे अंक, कंस व शब्द दाखल करण्यात येत आहेत;

(ख) " दिनांक३१ मार्च २०१६" या अंक व शब्दांऐवजी दिनांक "३१ मार्च २०१७" हे अंक व शब्द दाखल करण्यात येत आहेत;

(६) नोंद ५९ मध्ये, स्तंभ (२) मधील, दिनांक "३१ मार्च २०१६" अंक व शब्दांऐवजी दिनांक "३१ मार्च २०१७" हे अंक व शब्द दाखल करण्यात येत आहेत;

(७) नोंद ५९ नंतर खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"५९क केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये विहित केलेल्या टेस्टींग एजन्सीज अन्वये अधिकृत केलेल्या व्यापाऱ्यांनी, अपंग व्यक्तींच्या वाहनांमध्ये फेरबदल करण्यासाठी केलेली रिट्रोफिट किटची विक्री. शून्य टक्के ;

**दोन. अनुसूची ग मध्ये,—**

(१) शिर्षकामध्ये, "२% किंवा ३% किंवा ४% किंवा ५%" हे अंक, चिन्ह व शब्दांऐवजी "२% ते ५.५% या दरम्यान (दोन्ही सहित)" हे अंक, चिन्ह, कंस व शब्द दाखल करण्यात येत आहेत;

(२) स्तंभ (३) मध्ये,–

(एक) अनुक्रमांक १, २ आणि ३, या नोंदींसमोर जेथे जेथे "५%" हा अंक आणि चिन्ह असेल तेथे तेथे "५.५%" हे अंक आणि चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(दोन) अनुक्रमांक ४ ची उप-नोंद (ख), या नोंदीसमोर "५%" या अंक व चिन्हाऐवजी "५.५%" हे अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(तीन) अनुक्रमांक ५, ६, ७, ९, ११, १२, १३,१४, १५, १६, १७, १७क, १८, १९, २१, २३ आणि २४, या नोंदींसमोर जेथे जेथे "५%" हा अंक व चिन्ह असेल तेथे तेथे "५.५%" हे अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(चार) अनुक्रमांक २५ ची उप-नोंद (ख), या नोंदींसमोर "५%" या अंक व चिन्हाऐवजी "५.५%" हे अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(पाच) अनुक्रमांक २६, २८, ३१, ३१क, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ४३, ४४, ४६, ४७, ५०, ५३, ५३क, ५४, ५५ख, ५६, ५९, ६१, ६२, ६४, ६५, ६६, ६७, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७५क, ७६, ७७, ७९, ८०, ८१, ८२, ८२क, ८३, ८३क, ८४, ८५, ८५क, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९६, ९७, ९८, ९९ आणि १००, या नोंदींसमोर जेथे जेथे "५%" हा अंक व चिन्ह असेल तेथे तेथे "५.५%" हे अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(सहा) अनुक्रमांक १०१ ची उप-नोंद (ख), या नोंदीसमोर "५%" या अंक व चिन्हाऐवजी "५.५%" हे अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(सात) अनुक्रमांक १०३, १०५, १०७, १०८क, ११०, ११२,११३, ११४, ११५ आणि ११६, या नोंदींसमोर जेथे जेथे "५%" हा अंक व चिन्ह असेल तेथे तेथे "५.५%" हे अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(३) नोंद ३ नंतर खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :

"३क काटेरी तारा, तारेची जाळी, आणि साखळी दुवा. ५.५%";

(४) नोंद १० ऐवजी खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :-

"१०. अनुसूची 'क' मधील नोंद २७ख ज्याला लागू होते ते वगळून बांबू आणि बांबूची उत्पादने. ५.५%";

(५) नोंद २५ मध्ये, उप-नोंद (ख) नंतर, खालील उप-नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :–

"(ग) सरकी (गोसिपियम एसपीपी) २ %";

(६) नोंद २९ मध्ये, उप-नोंद (क) मध्ये,–

(क) स्तंभ (२) मध्ये, खंड (एक) मध्ये, " शाम्पू " या शब्दानंतर " केश तेल " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(ख) स्तंभ (३) मध्ये, " ५%" या अंक आणि चिन्हाऐवजी " ५.५% " हे अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत ;

(७) नोंद २९क मध्ये,–

(क) उपनोंद (घ) नंतर, खालील उप-नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :–

" (ङ) इंजेक्शनसाठी असलेले निर्जंतुक पाणी. ५.५% ";

(ख) स्तंभ (३) मध्ये, " ५%" या अंक आणि चिन्हाऐवजी " ५.५%" हे अंक आणि चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(८) नोंद ३० ऐवजी खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :–

"३० (क) खाद्यतेल, अशुध्द स्वरुपातील खाद्यतेल आणि *सरकी पेंड* वगळता इतर पेंड. ५.५% ";

(ख) जिंजिली तेल, एरंडेल तेल, ब्रान तेल सहित वनस्पती तेल. ५.५% ";

**स्पष्टीकरणः** पाचशे मिलिलिटरपर्यंतच्या किंवा समतुल्य किंवा त्यापेक्षा कमी मापाच्या कोणत्याही आवेष्टनातील खोबरेल तेल, विकल्यास या नोंदीत अंतर्भूत होत असल्याचे मानण्यात येणार नाही.

(९) नोंद ६८ मधील, उप-नोंद (तीन) वगळण्यात येत आहे;

(१०) नोंद ७९ नंतर, खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :-

"७९क प्लॅस्टिक अथवा जैविक कचऱ्यापासून बनविलेले पायरोलिसिस तेल. ५.५%";

(११) नोंद ८२क नंतर, खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेचः-

"८२ख राज्यात पूर्वीच्या टप्प्यावर प्रवेश कर अथवा विक्रीकर भरलेला असेल अशा पुनराधिपत्यीत वाहनांची बँका व वित्तीय संस्थांनी केलेली विक्री. ५.५%";

(१२) नोंद १०२ वगळण्यात येत आहे;

(१३) नोंद १०४ मध्ये,-

(क) स्तंभ (२) मधील, उप-नोंद (ग) मध्ये "ड्रॉईंग चारकोल" या शब्दानंतर पेन्सिल पेटी, डिंक, ग्ल्यूस्टिक्स, स्टेपलर पिन्स, टेप डिस्पेन्सर्स, डस्टर्स, फाईल्स" हे शब्द दाखल करण्यात येत आहेत.

(ख) स्तंभ (३) मध्ये, जेथे जेथे "५%" हा अंक आणि चिन्ह असेल, तेथे तेथे "५.५%" हे अंक आणि चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(१४) नोंद १०७ मधील, उपनोंद (११) मध्ये, *स्पष्टीकरणानंतर,* खालील खंड दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :-

"(छ) सेवनासाठी दिला असेल त्याव्यतिरिक्त प्रक्रिया केलेल्या, अंशतः प्रक्रिया केलेल्या, अंशतः शिजवलेल्या, तयार-मिश्रण, खाण्यासाठी तयार, सोललेल्या (shelled) मधुमक्याची,– ५.५% ";

(एक) गोठविलेल्या स्थितीत, वा

(दोन) हवाबंद डब्यात, वा

(तीन) व्यापार नामाखाली

असेल वा नसेल, अशी केलेली विक्री.

(१५) नोंद १०८ मधील, उप-नोंद (१) मध्ये,–

(क) स्तंभ (२) मधील, खंड (ख) मध्ये, दिनांक ३१ मार्च २०१६" या अंक व शब्दांऐवजी दिनांक ३१ मार्च २०१७" हे अंक व शब्द दाखल करण्यात येत आहेत;

(ख) स्तंभ (३) मध्ये, "५%" या अंक व चिन्हाऐवजी "५.५%" अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत;

(१६) नोंद १११ मध्ये,—

(क) स्तंभ (२) मध्ये "आणि एलईडी बल्बस्" या शब्दांऐवजी "एलईडी बल्बस् आणि एलईडी टयूब लाईटस्" हे शब्द दाखल करण्यात येत आहेत;

(ख) स्तंभ (३) मध्ये, "५%" या अंक व चिन्हाऐवजी "५.५%" हे अंक व चिन्ह दाखल करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. द. भगत,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai-400032, dated the 30th March 2016.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT. 1516/C.R. 31/Taxation-1.—In exercise of the powers conferred by sub-section (1) of section 9 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005), the Government of Maharashtra hereby, with effect from the 1st April 2016, amends SCHEDULES 'A'and 'C' appended to the said Act, as follows, namely :—

In the Maharashtra Value Added Tax Act, 2002,—

(I) In SCHEDULE A,—

(1) in entry 9A, in column (*2*), for the figures, letters and word, "31st March 2016" the figures, letters and word " 31st March 2017 " shall be substituted ;

(2) for entry 12A, the following entry shall be substituted, namely :—

" 12A (*1*) Drugs for treatment of Cancer, as may be notified from time to time, by the State Government, in the *OfficialGazette*. Nil %";

(*2*) Mammography machines, used for the diagnosis of Breast Cancer. Nil %";

(3) after entry 13, the following entry shall be inserted, namely :—

"13A Hybrid electric buses and battery operated buses, sold to public transport undertakings in the State, for public transportation. Nil %";

(4) after entry 27A, the following entry shall be inserted, namely :—

"27B Handicraftsmade of bamboo, excluding bamboo furniture. Nil %";

(5) in entry 51, in column (*2*),—

*(a)* in sub-entry (*vii*), after the word "Towels" the words, figures and brackets " covered under tariff item No. 63049260 of the Central Excise Tariff Act, 1985 (5 of 1986) " shall be added;

*(b)* the figures, letters and word "31st March 2016" the figures, letters and word, "31st March 2017" shall be substituted;

(6) in entry 59, in column (2), for the figures, letters and word, "31st March 2016" the figures, letters and word "31st March 2017" shall be substituted;

(7) after entry 59, the following entry shall be inserted, namely :—

"59A Retrofit kits, used to modify the vehicles of the handicapped persons sold by the dealers, authorized by the testing agencies prescribed in the Central Motor Vehicle Rules, 1989. Nil %".

(II) In Schedule C,—

(1) in the heading, for the figures, signs and words "2% or 3% or 4% or 5%", the words, figures and signs "between 2% to 5.5% (including both)", shall be substituted ;

(2) in column (*3*),—

(*i*) against entries at serial numbers 1, 2 and 3,for the figure and sign "5%", wherever it occurs, the figures and sign "5.5%" shall be substituted ;

(*ii*) against sub-entry (b) of entry at serial number 4, for the figure and sign "5%", the figures and sign "5.5%" shall be substituted ;

(*iii*) against entries at serial numbers 5, 6, 7, 9, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 17A, 18, 19, 21, 23 and 24 for the figure and sign "5%", wherever it occurs, the figures and sign "5.5%" shall be substituted;

(*iv*) against sub-entry (*b*) of entry at serial number 25, for the figure and sign "5%", the figures and sign "5.5%" shall be substituted;

(*v*) against entries at serial numbers 26, 28, 31, 31A, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 41, 43, 44, 46, 47, 50, 53, 53A, 54, 55B, 56, 59, 61, 62, 64, 65, 66, 67, 69, 70, 71, 72, 73, 74, 75, 75A, 76, 77, 79, 80, 81, 82, 82A, 83, 83A, 84, 85, 85A, 87, 88, 89, 90, 91, 92, 93, 94, 96, 97, 98, 99 and 100, for the figure and sign "5%", wherever it occurs, the figures and sign "5.5%" shall be substituted;

(*vi*) against sub-entry (b) of entry at serial number 101, for the figure and sign "5%", the figures and sign "5.5%" shall be substituted;

(*vii*) against entries at serial numbers103, 105, 107, 108A, 110, 112, 113, 114, 115 and 116, for the figure and sign "5%", wherever it occurs, the figures and sign "5.5%" shall be substituted;

(3) after entry 3, the following entry shall be inserted, namely :—

" 3A Barbed wire, wire mesh and chain link. 5.5%";

(4) for entry 10, the following entry shall be substituted, namely :—

"10. Bamboo and bamboo products, excluding those to which entry 27B of Schedule A applies. 5.5%";"

(5) in entry 25, after sub-entry (b), the following sub-entry shall be added, namely:-

(*c*) Cotton seed (Gossypium Spp) 2%";

(6) in entry 29, in sub-entry (a),—

(*a*) in column (2), in clause (i), after the word "shampoos" the words, " hair oils" shall be inserted;

(*b*) in column (3), for the figure and sign "5 %", the figures and sign "5.5%," shall be substituted;

(7) in entry 29A,—

(*a*) after clause (d), the following clause shall be added, namely :—

"(e) Sterile water for injection. 5.5%";

(*b*) in column (3), for the figure and sign "5 %", the figures and sign "5.5%," shall be substituted;

(*8*) for entry 30, the following entry shall be substituted, namely :—

" 30 (*a*) Edible oil, edible oil in unrefined form and oil cakes excluding *sarki pend*. 5.5%";

(*b*) Vegetable oil including gingili oil, castor oil and bran oil. 5.5%";

*Explanation*.— Coconut oil, measuring 500 ml or its equivalence in weight or less and sold in any form of packaging shall be deemed to be not covered by this entry.

(9) in entry 68, sub-entry (*iii*) shall be deleted;

(10) after entry 79, the following entry shall be inserted, namely :—

"79A Pyrolysis oil made from plastic scrap and organic waste. 5.5%;

(11) after entry 82A, the following entry shall be inserted, namely :—

" 82B Repossessed motor vehicles, sold by banks and financial institutions, on which entry tax or, as the case may be, sales tax, has been paid at an earlier stage in the State. 5.5%";

(12) entry 102 shall be deleted;

(13) in entry 104,—

(*a*) in column (2), in sub-entry (c), after the words " drawing charcoals" the words ", pencil box, gum, glue sticks, stapler pins, tape dispensers, dusters, files" shall be inserted;

(*b*) in column (3), for the figure and sign "5 %", wherever it occurs, the figures and sign "5.5% shall be substituted;

(14) in entry 107, in sub-entry (11), after *Explanation*, the following clause shall be added, namely :—

"(*g*) Processed, semi-processed, semi cooked, ready-mix, ready to eat, shelled sweet corn whether or not sold,—

(*i*) in a frozen state, or 5.5%".

(*ii*) in a sealed container, or

(*iii*) under a brand name

except when served for consumption.

(15) in entry 108, in sub-entry (1),—

(*a*) in column (2), in clause (b), for the figures, letters and word "31st March 2016" the figures, letters and word "31st March 2017" shall be substituted;

(*b*) in column (3), for the figure and sign "5%" the figures and sign "5.5%" shall be substituted.

(16) in entry 111,—

(*a*) in column (2), for the words " and LED bulbs" the words, " LED bulbs and LED tube lights" shall be substituted;

(*b*) in column (3) for the figure and sign "5%" the figures and sign "5.5%" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. D. BHAGAT,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.